RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १३(४)] बुधवार, जुलै ३१, २०२४/श्रावण ९, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.**—महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. पृष्ठे १-३

दिनांक २९ जुलै २०२४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**प्रकरण एक**

**प्रारंभिक.**

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कर विषयक कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) कलमे २, ३ व ४ ही, हा अधिनियम **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील आणि कलम ५ हे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून अंमलात येईल.

**प्रकरण दोन**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या सुधारणा.**

सन १९५८ चा अधिनियम. क्रमांक ६० याच्या कलम ३९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुद्रांक अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३९ मध्ये, पोट-कलम (१) मधील,– १९५८ चा ६०.

(१) " कलम ३३ " या मजकुराऐवजी, " कलम ३३ किंवा ३३अ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) " वीस नवे पैसे किंवा कमी शुल्क आकारण्याजोगा नाही असा कोणताही लेख " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(३) खंड (ब) मधील, " २ टक्के रकमेच्या " या मजकुराऐवजी, ", नोंदणी केलेल्या संलेखाच्या बाबतीत, १ टक्के इतक्या रकमेच्या आणि अन्य बाबतीत, २ टक्के इतक्या रकमेच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**३.** मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,–

(क) " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " एक वर्षाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुकामधील, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " एक वर्षाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " एक वर्षाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मधील, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " एक वर्षाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५० ची सुधारणा.

**४.** मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पोट-कलम (२) मधील, " सहा महिन्यांच्या " हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या ठिकाणी, " एक वर्षाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

### महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.

१९७५ चा महा. १६.

**५.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम २७अ मधील खंड (ह) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २७अ ची सुधारणा.

“ (ह) राज्यामध्ये सेवा बजावणारे,—

१९४९ चा ६६. (एक) केंद्रीय राखीव पोलीस दल अधिनियम, १९४९ अन्वये घटित केलेल्या केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ;

१९६८ चा ४७. (दोन) सीमा सुरक्षा दल अधिनियम, १९६८ अन्वये घटित केलेल्या सीमा सुरक्षा दलाचे ;

१९६८ चा ५०. (तीन) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अधिनियम, १९६८ अन्वये घटित केलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे ;

१९८६ चा ४७. (चार) राष्ट्रीय सुरक्षा रक्षक अधिनियम, १९८६ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाचे ;

१९९२ चा ३५. (पाच) इंडो-तिबेटीय सीमा पोलीस दल अधिनियम, १९९२ अन्वये घटित केलेल्या इंडो-तिबेटीय सीमा पोलीस दलाचे ;

२००६ चा ४७. (सहा) आसाम रायफल्स अधिनियम, २००६ अन्वये घटित केलेल्या आसाम रायफल्सचे ; आणि

२००७ चा ५३. (सात) सशस्त्र सीमा दल अधिनियम, २००७ अन्वये घटित केलेल्या सशस्त्र सीमा दलाचे, सशस्त्र सदस्य.”.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.